12:40:37 PM

नि.फौ.ख. क्र.७६/२०२०
सरकार वि संजय बनकर
निशाणी ५४

**अभियोग पक्षातर्फे सा.क्र.** ३

| | | |
|---|---|---|
| **साक्षीदाराचे नाव** | :- | किरण बाबासाहेब गंडे |
| वडीलांचे **पुर्ण नाव** | :- | बाबासाहेब सखाराम गंडे |
| **वय** | :- | ४१ वर्षे, |
| **व्यवसाय** | :- | पो.हे.कॉ, ब.न.५६८ |
| **राहणार** | :- | पोलीस स्टेशन कन्नड ग्रामीण , ता.कन्नड जि. छ.संभाजीनगर |

**सरतपास शपथेवर सरकारी पक्षांमार्फत सरकारी वकील श्री. एन.एस.बडगुजर यांच्यामार्फत**

**१.** मी कन्नड शहर पोलीस येथे सन २०१४ ते २०२१ पर्यंत कार्यरत होतो. तिथे कार्यरत असताना दि.२४.०१.२०२० रोजी ठाणे अंमलदार एन.पी.शी. पोलीस नाईक ठाकुर, यांनी गु.र.क्र.१३/२०२० कलम ४९८-अ, ३२३, ५०४, ५०६, ३४ नोंद केला. सदर आदेश निशाण ३७ येथे आहे. त्यावर ठाणे अंमलदार यांची सही आहे. ती सही मी ओळखतो. तपासकाम माझ्याडे आल्यानंतर एफ.आय.आर. आणि फिर्याद हस्तगत करुन सदर फिर्यादीचे लग्नाचा पुरावा हस्तगत केले आणि साक्षीदार तपासले. तसेच साक्षीदारांना नोटीस दिली. आरोपी यांना ४१ अ प्रमाणे नोटीस दिली. त्यानंतर दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.महिला निवारण केंद्र छ.संभाजीनगर यांच्याकडून पत्र हस्तगत केले. आता मला दाखविण्यात आलेले पत्र तेच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर सहाय्यक पोलीस निरीक्षक महिला दक्षता कन्नड याची सही आहे. ती मी ओळखतो. पत्राला **निशाण क्र.PW-3-55** देण्यात येते. त्यासोबत फिर्याद हिने महिला निवारण केंद्राकडे दिलेला अर्ज निशाण ३६ येथे आहे. त्यानंतर साक्षीदारांचे जाबजबाब घेतले. त्यानंतर आरोपीविरुध्द कलम ४९८-अ, ३२३, ५०४, ५०६, ३४ पुरावा आल्याने दोषारोप न्यायालयात दाखल केले. आरोपींना पाहिल्यास ओळखतो. आरोपींपैकी आरोपी क्र.२ हजर आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.आर.बी.सातदिवे यांच्यामार्फत**

३.	तपासकामामध्ये असे काही निष्पण्ण झाले नाही की, फिर्यादी हिने पोटगी मिळण्याकरीता प्रकरण दाखल केले होते. फिर्यादीला शारिरीक व मानसिक त्रास होता किंवा कसे याबाबत शेजा–यांकडे विचारपूस केली. मी शेजा–याच्या लोकांचे जबाब नोंदवले नाही. हे खरे नाही की, मी चुकीचा तपासकाम केलेला आहे. हे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2026.06.29 16:28:48 +0530

**(वि. द. पाटील)**

दि.२९/०६/२०२६

12:56:42 PM

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**कन्नड**

## CERTIFICATE

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | |
|---|---|
| Name of Stenographer | V. D. Khambat, (Grade-III) |
| Court | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Kannad |
| Date | 29.06.2026 |
| Order signed by the Presiding Officer | 29.06.2026 |
| Order uploaded on | 29.06.2026 |